पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ६६ दिनांक २६/११/२०२२

# अनधिकृत कॉल सेंटर चालवून फसवणुक करणाऱ्या आरोपींना पालघर पोलीसांकडून जेरबंद

पालघर पोलीस दलाकडून दि.२४/११/२०२२ रोजी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शन व सुचनांखाली पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडून जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी लावून तसेच कोंबींग ऑपरेशन राबवून अवैध धंद्यांवर कारवाई तसेच गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी ऑल आउट ऑपरेशन राबविण्यात आले.

सदर ऑल आउट ऑपरेशन दरम्यान सातपाटी पोलीस ठाणे हद्दित सपोनि/प्रेमनाथ ढोले, प्रभारी अधिकारी सातपाटी पोलीस ठाणे यांना नाकाबंदी तसेच कोम्बींग ऑपरेशन राबविण्याचे सुचित केले. त्यानुसार गुप्त बातमीद्धारे मौजे पाम गावचे हद्दीत वृंदावन सोसायटी बिल्डींग नं. ०८, एच विंग, रुम नं. १०३ येथे छापा टाकला असता चार संशयीत इसम १) आरोपीत वय २५ वर्षे, रा. ग्राम तिमाईपल्ले थांडा, पो. अडाकल मंडल ता. जि. महबुबनगर राज्य आंध्रप्रदेश, २) आरोपीत वय १९ वर्षे, रा. ग्राम गटलाखानापुर पोस्ट विलदुर ता. जि. वनपरती राज्य आंध्रप्रदेश, ३) आरोपीत वय १९ वर्षे रा. ग्राम बालिजापल्ली पो. पामीरेड्डीपल्ली ता. जि. वनपरती राज्य आंध्रप्रदेश, ४) आरोपीत वय २८ वर्षे, रा. ग्राम बालिजापल्ली पो. पामीरेड्डीपल्ली ता. जि. वनपरती राज्य आंध्रप्रदेश हे त्यांचे कब्जात ०२ लॅपटॉप, १४ मोबाईल फोन व ०४ नोटबुक अशा साहित्याचा वापर करीत असल्याचे दिसून आले.

नमुद इसमांकडे सखोल चौकशी केली असता ते अनधिकृत कॉल सेंटर चालवून इंडीयाबुल्स कन्झुमर फायनान्स या कंपनीकडे कर्ज मिळविणाऱ्या ग्राहकांना संपर्क साधून कर्ज मिळवून देतो असे सांगुन इंडीयाबुल्स कन्झुमर फायनान्स चे बनावट कर्जाचे फॉर्म ग्राहकांना व्हाट्सपद्धारे पाठवून त्यांचेकडे माहिती भरुन घेवून नंतर त्यांना कर्ज मंजुर झाल्याबाबत इंडीयाबुल्स कन्झुमर फायनान्स चे बनावट लेटरपॅड पाठवून कर्ज मिळवून देण्याची प्रोसेस फी म्हणून इन्शुरन्स, टीडीएस, जीएसटीच्या नावाखाली ग्राहकांकडून फोन पे, गुगल पे वरुन पैसे स्विकारुन त्यांची फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्ह्याची व्याप्ती हि आंध्रप्रदेश, तेलंगणा, बिहार व पश्चिम बंगाल राज्यात आहे.

याबाबत सातपाटी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ९०/२०२२ भादविसं कलम ४१७, ४२०, ४६७, ४७१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६५ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढिल तपास हे पोनि/अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा पालघर हे करीत आहेत.

सदरची कारवाई हि श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा पालघर, सपोनि/प्रेमनाथ ढोले, प्रभारी अधिकारी सातपाटी पोलीस ठाणे, पोउपनि/मयुरेश अंबाजी, पोना/४३९ भारत सानप, पोशि/५१ गणेश व्हसकोटी सर्व नेम. सातपाटी पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


सातपाटी सागरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ९०/२०२२ भादंविस कलम ४१७, ४२०, ४६७,४७१,३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनीयम कलम ६५ ड मधील जप्त मुद्देमाल.
सातपाटी सागरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ९०/२०२२ भादंविस कलम ४१७, ४२०, ४६७,४७१,३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनीयम कलम ६५ ड मधील जप्त मुद्देमाल.
सातपाटी सागरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ९०/२०२२ भादंविस कलम ४१७, ४२०, ४६७,४७१,३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनीयम कलम ६५ ड मधील जप्त मुद्देमाल.

